पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोलीजनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail**: prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- १७/०८/२०२०*

## पोलीस मदतकेंद्र येरकड येथे शेतकऱ्यासाठी शेवगाची शेती लागवड व प्रशिक्षणकार्यक्रमाचे आयोजन

दिनांक १३/०८/२०२० रोजी गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने पोलीस मदतकेंद्र येरकड याठिकाणी तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) व तालुका कृषी अधिकारी कार्यालय धानोरा यांच्या मार्फतीने शेवगाची शेती लागवड व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन श्री. आनंद पाल सा.,तालुका कृषी अधिकारी धानोरा तसेच माजी विस्तार अधिकारी श्री. सावसागडे तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापन (आत्मा), श्री. जयंत टेभुर्णे, कृषी साहाय्यक श्री. विवेक मडावी तसेच पोलीस मदत केंद्र येरकड येथील सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी व पोलीस मदत केंद्र हद्दीतील सर्व शेतकरी बांधव उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाची प्रस्तावना पोमके प्रभारी अधिकारी श्री. अंकुर शेलार यांनी केले. सदर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित श्री. आनंद पाल सा. यांनी शेतकऱ्यांना शेवगाची शेती लागवड ते फळधारण याबाबत शास्त्रोक्त पध्दतीने मार्गदर्शन केले. त्यानंतर माजी विस्तार अधिकारी श्री. सावसागडे सा. यांनी शेतकऱ्यांना तंत्रज्ञाना विषयक मार्गदर्शन करुन उपस्थित सर्व शेतकरी बांधवांना आत्मा अंतर्गतगट तयार करण्यात आला. व उपस्थित वीस शेतकरी यांना पोमकेच्या नर्सरीमध्ये तयार केलेली एकुण दोन हजार शेवगाची झाडे प्रत्येकी शंभर प्रमाणे वाटप करुनत्यांचे लागवटीसाठी उपयुक्त माहिती पुस्तकाचे देखील प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.


REDMI NOTE 8 PRO
AI QUAD CAMERA


REDMI NOTE 8 PRO
AI QUAD CAMERA